# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक ३०८/२०२४ दिनांक- १७/०८/२०२४.

## "नवघर पोलीस ठाणे रेकॉर्डवरील आरोपीतास अटक करुन ०५ गुन्हे उघडकीस आणण्यास नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश"

नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ४६७/२०२४ बि.एन.एस कलम ३०३ (२) दि.१६.०८.२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयातील फिर्यादी श्री क्रिपाशंकर अखलेश्वर तिवारी, व्यवसाय- केळी विक्री करणे रा.रुम नंबर ए/विंग जी-०४, जोतीधाम बिल्डींग, कॉबीन रोड, भाईदर पुर्व ता.जि.ठाणे हे बि.पी.रोड येथे केळी विक्रीचा व्यवसाय करतात. नमुद फिर्यादी यांनी त्यांचे मालकीची ७५,०००/- रुपये किंमतीची एक लाल काळ्या रंगाची होंडा कंपनीची पॅशन मॉडेलची मोटार सायकल क्र.एम.एच-०४ डी.यु.७९३९ ही मेडिटेक हॉस्पिटल जवळील रोडलगत, न्यु शाही हॉटेल जवळ, मिरा भाईंदर रोड, भाईंदर पुर्व, ता. जि. ठाणे येथे पार्क करुन ठेवली असता तेथून ती कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे संमत्तीशिवाय लबाडीच्या इराद्याने उघड्यावरुन चोरी करुन चोरुन नेलीबाबत खात्री झाल्याने त्यांनी पोलीस ठाणेस येवुन तक्रार दिल्याने वर नमुदप्रमाणे गुन्हा नोद करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा उघड्यावरुन चोरीचा गंभीर स्वरुपाचा असल्याचे पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, सहाय्यक पोलीस आयुक्त, नवघर विभाग तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे यांनी गुन्हा उघडकीस आणण्याच्या सुचना दिल्या होत्या. मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे नमुद गुन्हयातील घटनास्थळावरुन व घटनास्थळाचे आजुबाजुवरुन प्राप्त केलेले सीसीटीव्ही कॅमेरांचे फुटेज यांची पडताळणी केली असता गुन्हयातील संशयित आरोपी हा मोटार सायकल चोरी करत असतांना दिसुन येत आहे. नमुद आरोपी हा नवघर पोलीस ठाणे रेकॉर्डवरील आरोपी प्रेमचंद रामदुलारी चौधरी, रा. नागीनदास पाडा, चिंचोटी, ता.वसई जि.पालघर हा असल्याचे निष्पन्न झाले होते. त्याअनुशंगाने आरोपी याचा मोबाईल नंबर प्राप्त करुन त्याचे मोबाईल नंबरचे तांत्रिक विश्लेषण करुन त्यास नागीनदास पाडा, चिंचोटी येथुन सापळा रचुन ताब्यात घेण्यात आले असुन आरोपी याचा गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास सदर गुन्हयात दिनांक १७/०८/२०२४ रोजी ००.२४ वा.अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास पोहवा/०३००४ निर्मळ हे करत आहे. अटक आरोपी याचे विरोधात खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहे.

१) नवघर पोलीस ठाणे गुरक्र-५५/२०२२ भादविस कलम ३८० प्रमाणे
२) काशिमीरा पोलीस ठाणे गुरक्र-४९१/२०२१ भादविस कलम ३७९ प्रमाणे
३) नवघर पोलीस ठाणे गुरनं ४४८/२०२४ बी.एन.एस.एस कलम ३०५ (ए), ३३१ (४) प्रमाणे३
४) नवघर पोलीस ठाणे गुरनं **४४७/२०२४ कलम बि.एन.एस ३०३(२) प्रमाणे**
५) नवघर पोलीस ठाणे गुरनं ४४६/२०२४ बी.एन.एस.एस कलम ३०५ (ए) प्रमाणे

सदरची कामगिरी श्री. मधुकर पांण्डेय, पोलीस आयुक्त, मि.भा-व.वि.पोलीस आयुक्तालय, श्री.दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री.राजेंद्र मोकाशी सहा.पो.आयुक्त, नवघर

विभाग यांचा मार्गदर्शनाखाली धिरज कोळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोलीस निरीक्षक(गुन्हे) अशोक कांबळे, सपोनि अमोल तळेकर, पोउनि-ज्ञानेश्वर आसबे, पोहवा/भुषण पाटील, संतोष पाटील, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, जयप्रकाश जाधव, पोशि/ओंकार यादव, सुरजसिंग घुनावत, संकेत मगर, अस्वर, पवार तसेच मसुब/कुणाल हिवाळे यांनी केलेली आहे.

**--------------0000--------------**